(ई) राष्ट्रसंतांनी समाजातील जातीय भेदभावांचा कशा प्रकारे निषेध केला ? 5

किंवा

(क) साहित्य हे जनभाषेत असावे असे राष्ट्रसंत का म्हणतात ? 5

(ख) राष्ट्रसंतांचा वैज्ञानिक दृष्टिकोण स्पष्ट करा. 5

(ग) राष्ट्रसंतांनी समाजामध्ये राष्ट्रीय जाणीव कशा प्रकारे निर्माण केली ? 5

(घ) श्री गुरुदेव या अधिष्ठाना मागील राष्ट्रसंतांची भूमिका स्पष्ट करा. 5





**B.A. (Part–I) Examination**

**RASHTRASANT TUKDOJI THOUGHT**

**(Optional Subject)**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 100

**सूचना :—** (1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.

(2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

(3) प्रश्न क्रमांक 1 मधील सर्व बहुपर्यायी उपप्रश्न सोडविणे आवश्यक आहे .

1. योग्य पर्याय निवडा :

(i) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा जन्म ______ येथे झाला.
(अडगाव, यावली, मोर्शी) 2

(ii) 1955 साली विश्वधर्म परिषदेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कोणत्या देशात गेले ?
(जपान, जर्मनी, इटली) 2

(iii) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी वयाच्या ______ वर्षी गृहत्याग करून वनवास पत्करला. (पंधराव्या, चौदाव्या, तेराव्या) 2

(iv) राष्ट्रसंत तुकडोजींनी सेवाग्राम आश्रमात ______ हे पुस्तक लिहिले.
(ग्रामगीता, आनंदामृत, लहर की बरखा) 2

(v) राष्ट्रसंत तकडोजी महाराजांचे गुरु कोण ?
(महात्मा गांधी, आडकोजी महाराज, गाडगे बाबा) 2

(vi) राष्ट्रसंतांच्या आईचे नाव काय होते ?

(राधिका माय, मंजुळा माय, कमला माय) 2

(vii) प्रयाग येथे 1966 साली संपन्न झालेल्या विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष कोण होते ?

(महात्मा गांधी, पंडित नेहरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज) 2

(viii) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची समाधी कुठे आहे ?

(गुरुकुंज मोझरी, तिवसा, मोर्शी) 2

(ix) राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेत कोणती संकल्पना साकारली ?

(आदर्श शहराची, आदर्श गावाची, आदर्श नगराची) 2

(x) राष्ट्रसंतांचे महानिर्वाण ______ साली झाले.

(1968, 1969, 1970) 2

2. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या स्वातंत्र्यपूर्वकाळातील महत्वपूर्ण कार्याचा आढावा घ्या. 20

किंवा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे राष्ट्रजागरणाचे उपक्रम विशद करुन बेचाळीसच्या क्रांतियुद्धातील त्यांची भूमिका स्पष्ट करा. 20

3. (अ) श्रमदान व समयदान या सेवा आदर्श ग्रामनिर्माण करू शकतात, विवेचन करा. 5

(आ) राष्ट्रसंतांचा भूदान चळवळीतील सहभाग स्पष्ट करा. 5

(इ) राष्ट्रसंतांच्या ग्रामसंरक्षण विषयक विचारांचा परामर्श घ्या. 5



(ई) राष्ट्रसंतांनी शाहीर व कीर्तनकारांना कोणते मार्गदर्शन केले ? 5

किंवा

(क) राष्ट्रसंतांनी गोवा संस्थानच्या विलीनीकरणात कशाप्रकारे सहयोग दिला ? 5

(ख) ग्रामोद्धारातच राष्ट्रोद्धार आहे हे राष्ट्रसंतांनी कशाप्रकारे पटवून दिले ? 5

(ग) गांधीजींच्या हत्येनंतर प्रक्षुब्ध झालेले वातावरण शांत करण्याकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी कोणते प्रयत्न केले ? 5

(घ) राष्ट्रसंतांनी साहित्यिकांना कोणता उपदेश केला ? 5

4. राष्ट्रसंताच्या शिक्षण-प्रशिक्षण विषयक विचार व कार्यावर प्रकाश टाकून त्यांनी युवकांना विधायक कृतिशीलतेकडे कसे वळविले ते सांगा. 20

किंवा

राष्ट्रसंतांचा जीवनमूल्य संवर्धनाचा दृष्टिकोन स्पष्ट करून त्यांच्या 'महिलोन्नती' विषयक विचार व कार्यावर प्रकाश टाका. 20

5. (अ) राष्ट्रसंतांनी अध्यात्म व विज्ञान यांचा तालमेळ कसा घालून दिला ? 5

(आ) राष्ट्रसंतांनी भजनाद्वारे समाजाचे प्रबोधन कशाप्रकारे केले ? 5

(इ) राष्ट्र संतांनी सामुदायिक प्रार्थनेद्वारे परिवर्तनाच्या कोणत्या बाबी रुजविल्या ? 5